**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
वांद्रा (पूर्व), मुंबई - ५१.
E mail : info@sra.gov.in
दुरध्वनी : ०२२-२६५९०५१९ फॅक्स : ९१-२२-२६५९०४५७

क्र. झोपुप्रा/अभि/कार्या/११०७४/Gen
दिनांक :- 15 OCT 2012

**परिपत्रक क्र.---१४०**

विषयः- पुनर्वसन घटकामधील पात्र अनिवासी गाळेधारकांच्या संमतीबाबत.

अभियांत्रिकी विभागातर्फे ज्या इमारतीमध्ये पुनर्वसन घटकातील अनिवासी गाळे प्रस्तावित केले आहेत अशा इमारतींचे आराखडे मंजूर करतेवेळी योजनेतील पात्र अनिवासी गाळेधारकांच्या सदर आराखडयांवर सहया घेण्याची पध्दत प्रचलित आहे. परंतु सर्वच गाळेधारकांना त्यांना हव्या त्या ठिकाणी व रस्त्यालगत गाळे देणे विकासकांना/वास्तुविशारदांना नियोजनातील अडचणीमुळे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे काही गाळेधारक संमती देत नसल्यामुळे वाद होऊन योजनेस दिरंगाई होत आहे.

यास्तव, योजनेला होणारा विलंब टाळण्यासाठी जर एखादया गाळेधारकाने संमती देण्यास नकार दिल्यास सदर योजनेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सचिव व एक सभासद यांच्या सदर आराखडयांवर सहया घेण्यात येतील आणि /अथवा त्यांच्याकडून सदर गाळयांच्या नियोजनाबाबत अवगत असल्याचे पत्र घेण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा)

D:\KAMBLE\Bandgar EE\Regarding consent of slum dwellers.doc

प्रत:-

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक

२) मा. सचिव यांचे स्वीय सहाय्यक

३) मा. वित्त नियंत्रक यांचे स्वीय सहाय्यक

४) उप मुख्य अभियंता

५) उपजिल्हाधिकारी

६) उपनिबंधक

७) विधी सल्लागार/झोपुप्रा

८) सहाय्यक संचालक नगर रचना/झोपुप्रा

९) कार्यकारी अभियंता(झोपुप्रा) -१,२,३

१०) तहसिलदार/प्रशासन

११) प्रशासकीय अधिकारी/झोपुप्रा

१२) जनसंपर्क अधिकारी/झोपुप्रा

१३) सहाय्यक निबंधक /झोपुप्रा

१४) नगर भू मापन अधिकारी

१५) लेखा अधिकारी

१६) माहिती तंत्रज्ञान अधिकारी/झोपुप्रा

१७) प्रशासन नस्ती